# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 26.10.2016 (का.प.क्र.-07) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 26 ऑक्टोंबर 2016 (का.प.क्र .07) रोजी मा.सभापती श्री.मोहन मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12.00 वाजता सुरू झाली. सभेला मा.आयुक्त श्री.रविंद्र निकम, उपआयुक्त (प्र.), नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |

श्री.कैलास गायकवाड : शहरातील पाणीपुरवठा विस्कळीत झालेला आहे. पाणीपुरवठा प्रश्नी स.सदस्य पाण्याच्या टाकीवर आंदोलन करीत आहे. आजची सभा तहकुब करावी.

मा.सभापती : पुर्ण शहरामध्ये निर्जळी आहे. दिपावली सन जवळ आलेला आहे. पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. जवळपास शहरासह सिडको, हडकोमध्ये पाण्याची परिस्थिती गंभीर बनलेली आहे. स.सदस्य एन-5 टाकीवर बसलेले आहे. मा.आयुक्त रिसर्च सेंटर येथे बैठक घेत आहेत. सभागृहात कोरमही नाही. त्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात येते.

याच बरोबर मा.सभापती यांनी आजची सभा तहकुब करीत असल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद